महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र:०२२-६८५९७४८६, ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.in , वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ : रजिस्टर एडी / ईमेल द्वारे

क्र. : १८/तंशिसं/एमसीएम/संस्था-पत्र/२०२०-२१/२०५
दि. - ०४ / ०९/२०२०

प्रति,
सर्व संबंधीत संस्थाचे प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता,
(मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था)
महाराष्ट्र राज्य.

**विषय :- सन २०२०-२१ साठी अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी असलेल्या केंद्र शासनाच्या गुणवत्ता - नि -साधन शिष्यवृत्ती ( मेरीट-कम-मिन्स ) योजनेच्या कार्यवाहीबाबत...**

**संदर्भ :-** अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडून सन २०२०-२१ साठीचे **केंद्रशासन पुरस्कृत गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती** योजनेच्या अंमलबजावणीबाबतच्या सूचना.

उपरोक्त विषयाबाबत खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१. अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची तंत्रशिक्षण संचालनालय, म. राज्य, मुंबई ( State Nodal Officer ) यांचेमार्फत केंद्र शासनाच्या National Scholarship Portal (NSP) द्वारे ( संकेतस्थळ-www.scholarships.gov.in ) राबविली जाणारी अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता -नि - साधन शिष्यवृत्ती योजना (Merit cum Means) केंद्र शासनानकडून शै.वर्ष २०२०-२१ साठी सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजना व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिकणाऱ्या **मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी आणि जैन** या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांकरीता व ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ( दोन्ही पालकांचे एकत्रित ) **रुपये २.५० लाखापर्यंत** आहे अशा विद्यार्थ्यांना लागू करण्यात आलेली आहे. सदर योजनेची सविस्तर माहिती केंद्र शासनाच्या अल्पसंख्यांक कार्य मंत्रालयाच्या संकेतस्थळ www.minorityaffairs.gov.in वर देण्यात आलेली आहे. सदर योजनांची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून सरळ विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये डीबीटी अंतर्गत जमा करण्यात येते.

२. संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक समाजातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नुतनीकरणासाठीचे (Renewal) ऑनलाईन अर्ज www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर केंद्र शासनाने जाहिर केलेल्या तारखेनुसार संकेतस्थळावर देण्यात आलेल्या User Manual/ Guideline व FAQ चा वापर करुन दि.३१/१०/२०२० पूर्वी भरण्याबाबत सूचित करावे.

३. संस्थेने NSP पोर्टलचा Login ID व Password चा वापर करुन, Institute Profile अंतर्गत अभ्यासक्रमांसाठी आकारली जाणारी शुल्काची माहिती बिनचुक भरावी कारण सदरचे शुल्क विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जासाठी लागू होणार आहे. तसेच, संस्थेच्या लॉगीन आयडीमध्ये प्राप्त झालेले विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता अर्जामध्ये विद्यार्थ्यांनी भरलेल्या माहितीची खात्री करुन , दि. १५/११/२०२० पूर्वी निकाली काढावे.



4199
16 SEP 2020

४. विद्यार्थी केंद्र शासनाच्या ( NSP Portal ) व महाराष्ट्र शासनाच्या ( DBT Portal ) पोर्टलवरील योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबत संस्थांनी योग्य ती दक्षता घ्यावी.

- विद्यार्थ्याने एकाच वर्षाकरिता दोन - दोन योजनांचा ( केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही योजनांचा ) लाभ प्राप्त करुन घेतल्यास किंवा संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्याच्या अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्याचे आढळून आल्यास किंवा
- जर अंतिम मुदतीनंतर कोणतेही अर्ज तपासणीसाठी प्रलंबित राहील्यास किंवा
- कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहील्यास तर याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

टीप :- व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या ज्या संस्थांनी मागील वर्षी NSP पोर्टलचा लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन, संस्था रजिस्ट्रेशन अर्ज (Institute KYC) भरुन मंजूरी घेतलेली नाही अशा सर्व संस्था प्रमुखांना कळविण्यात येते की, अशा संस्थांनी केंद्र शासनाच्या NSP पोर्टल ( www.scholarships.gov.in ) वर संस्थेकडे असलेला पोर्टलचा लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Institute Login अंतर्गत उपलब्ध असलेल्या Operational Manual अंतर्गत देण्यात आलेल्या "To Fill Registration Form" मध्ये दिलेल्या सूचनांनुसार, Registration Form काळजीपूर्वकरित्या संपूर्ण भरुन त्याची साक्षांकीत प्रत ( Printout with duly signed ) संस्थेच्या पत्राद्वारे *संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मेट्रो सिनेमा समोर, म.राज्य, मुंबई -४०० ००१* यांचेकडे टपालाने किंवा त्याची scan copy "**desk18@dtemaharashtra.gov.in**" या ईमेल आयडीवर १० दिवसांच्या आत मंजूरीसाठी पाठवून मंजूर करुन घ्यावा. संस्थेकडून Registration Form मध्ये भरलेल्या माहितीला मंजूरी मिळाल्यानंतर संस्थांच्या नोडल ऑफीसरच्या मोबाईल नंबरवर ऑनलाईन प्रणालीद्वारे संस्थेला नवीन पासवर्ड प्राप्त होणार आहे. त्या प्राप्त पासवर्डचा वापर करुन संस्थांनी Operational Manual अंतर्गत देण्यात आलेल्या "To Update Profile" मध्ये दिलेल्या सूचनांनुसार, Institute Profile अद्ययावत करुन घ्यावी. अन्यथा या कारणास्तव संस्थेत शिकणारा कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

५. ज्या संस्था National Scholarship Portal ( www.scholarships.gov.in ) वर नोंदणीकृत झालेल्या नाहीत ( यादी पोर्टलवर उपलब्ध ) किंवा संस्था पूर्वीचा लॉगीन आयडी व पासवर्ड विसरली असेल अशा व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील संस्थांनी पत्राद्वारे खालील प्रपत्रातील माहिती AISHE Code Certificate सह *संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मेट्रो सिनेमा समोर, म.राज्य, मुंबई -४०० ००१* यांचेकडे टपालाने किंवा त्याची scan copy "**desk18@dtemaharashtra.gov.in**" या ईमेल आयडीवर पाठविण्यात यावी जेणेकरुन ऑनलाईन सिस्टिमद्वारे Login_Id व Password प्रपत्रामध्ये दिलेल्या मोबाईल नंबरवर पाठविता येईल व संस्थांना त्याचा वापर करुन वरील दिलेल्या पध्दतीने Registration Form भरुन मंजूरीसाठी जमा करता येईल.

| Information of Institute for receiving the Login Id and Password of **National Scholarship Portal** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| AISHE (All India Survey on Higher Education) Code (ex. C-XXXXX) | Previous Registered Code on NSP Portal / Login Id of Portal ( If Institute have ) otherwise mention " NA" | Institute Name as per AISHE (All India Survey on Higher Education) Code | DTE Code ( Only for that Inst. which comes under DTE) | Institute Address | Institute District | Details ( on which Login_id and Password will be required ) | |
| | | | | | | Name | Mobile No. |
| | | | | | | | |

( डॉ. अभय वाघ. )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई.

\\192.168.1.9\Desk18\Minority cell\Shaskya patra\From 2020-21\MCM\letter-to-institute-2020-21.doc

प्रत - यांना माहितीसाठी व त्यांच्या संकेतस्थळावर जाहिर करण्यासाठी व त्यांच्या अधिनस्त व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संबंधित सर्व संस्थांना सूचना देण्याच्या आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद
२) मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, सीएसटी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई - ४०० ००१.
३) मा. संचालक, आयुष संचालनालय, चौथा माळा, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, सीएसटी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई - ४०० ००१.
४) मा. संचालक, इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकाउन्टस ऑफ इंडिया, आयसीएआय टॉवर, प्लॉट नं. सी-४०, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा ईस्ट, मुंबई - ४०० ०५१.
५) मा. संचालक, कला संचालनालय, सर जे जे स्कुल ऑफ आर्ट कॅम्पस, डॉ. डी.एन. रोड, फोर्ट, मुंबई-०१.
६) मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-०१.
७) मा. संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, पुणे - ४११ ०३७.
८) मा. संचालक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालय, १७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे-०१.

प्रत - यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

१. Head of the Institute, Indian Institution of Technology (IIT), Main Gate Rd, IIT Area, Powai, Mumbai, Maharashtra 400076.
२. Head of the Institute, National Institute of Industrial Engineering, Vihar Lake, P.O. NITIE, Mumbai – 400 078.
३. Head of the Institute,National Institute of Fashion Technology, Plot no. 15, Service Road, Sector 4, Kharghar, Navi Mumbai, Maharashtra 410210 .
४. Head of the Institute,Visvesvaraya National Institute of Technology, S Ambazari Rd, Ambazari, Nagpur, Maharashtra 440010.

प्रत - यांना माहितीसाठी सविनय सादर.

१) मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

***************

## Latest Updates

National Scholarship Portal is open for Fresh and Renewal Applications

**Attention Institutes**

The Institutes which are registered on NSP 2.0 are required to submit

## HelpDesk

Candidates can contact the Help Desk for resolution of the technical problems

0120 - 6619540

helpdesk[at]nsp[dot]gov[dot]in



**Ministry of Minority Affairs**

| | Scheme Closing Date | Defective Verification | Institute Verification |
|---|---|---|---|
| Pre Matric Scholarships Scheme for Minorities<br>Guidelines FAQ | Open till 31-10-2020 | Open till 15-11-2020 | Open till 15-11-2020 |
| Post Matric Scholarships Scheme for Minorities<br>Guidelines FAQ | Open till 31-10-2020 | Open till 15-11-2020 | Open till 15-11-2020 |
| Merit Cum Means Scholarship For Professional and Technical Courses CS<br>Guidelines FAQ | Open till 31-10-2020 | Open till 15-11-2020 | Open till 15-11-2020 |

- **Department of Empowerment of Persons with Disabilities**
- **Ministry of Social Justice & Empowerment**
- **Ministry of Labour & Employment**
- **Ministry of Tribal Affairs**
- **Department of School Education & Literacy**